**जोडपत्र - २**

**अनिवासी (बाह्य) खात्यातील ठेवलेल्या ठेवींवर**
**लागु असलेले व्याजदर**
**(परिच्छेद २.२ (ब) (१) )**

| | | |
|---|---|---|
| १ | चालु | काही नाही |
| २ | बचत खाते | डिसेंबर १६, २०११ पासून व्याजदरांचे डिरेग्युलेशन करण्यात आले आहे. तथापि, बँकांद्वारे एनआरई ठेवींवर देऊ करण्यात आलेले व्याजदर, तुलनात्मकरीत्या, देशांतर्गत रुपये ठेवींवर त्यांच्याद्वारे दिल्या जाणा-या व्याजदरांपेक्षा अधिक नसावेत. |
| | | ऑक्टोबर २५, २०११ पासून देशांतर्गत बचत ठेवींवरील व्याजदरांचे डिरेग्युलेशन करण्यात आले असल्याने, ऑक्टोबर २५ ते डिसेंबर १५, २०११ ह्या कालासाठी, एनआरई बचत ठेवींवरील व्याजदर हा, परिपत्रक डीबीओडी.डीआयआर.बीसी. ८९ व ९०/१३.०३.००/२०१०-११ मध्ये विहित केल्यानुसार दरसाल ४% होता. |
| | | नोव्हेंबर १७, २००५ रोजी भारतातील व्यवहार बंद झाल्यावर ते ऑक्टोबर २४, २०११ पर्यंत, एनआरई बचत ठेंवीवरील व्याजदर, युएस डॉलर ठेवींवर, सहा महिन्यांच्या परिपक्वतेच्या लिबॉर/स्वॅप दरांच्या ऐवजी, देशांतर्गत बचत खात्याला लागु असलेल्या व्याजदाराएवढेच असतील. |
| ३ | मुदत ठेवी | डिसेंबर १६, २०११ रोजी भारतातील व्यवहार समाप्तीपासून अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवींवरील व्याजदर डिरेग्युलेट करण्यात आले आहेत. त्यानुसार, अनिवासी (बाह्य) रुपये (एनआरई) ठेवी खात्यांखाली, एक वर्ष व त्यापेक्षा अधिक अशा दोन्हीही परिपक्वता कालावधीच्या मुदत ठेवींवरील व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य बँकांना देण्यात आले आहे. |
| | | नोव्हेंबर २३ ते डिसेंबर १५, २०११ पर्यंत भारतातील व्यवहार समाप्तीपासून, एक ते तीन वर्षांसाठी असलेल्या एनआरई ठेवींवरील व्याजदर, तत्सम परिपक्वता कालाच्या युएस डॉलर्ससाठी, मागील महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेल्या, लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक २७५ बेसिस पॉईंट्सपेक्षा जास्त असू नयेत. (नोव्हेंबर १५, २००८ रोजी व्यवहार बंद झाल्यावर असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक १७५ बेसिस पॉईंट्सच्या तुलनेने) |
| | | नोव्हेंबर १५, २००८ रोजी भारतात व्यवहार बंद झाल्यावर पासून ते नोव्हेंबर २२, २०११ पर्यंत, एक ते तीन वर्षांसाठी असलेल्या एनआरई ठेंवीवरील व्याजदर हे, परिपक्वताकालच्या युएस डॉलर्ससाठी, मागील महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक १७५ बेसिस पॉईंट्सपेक्षा जास्त असू नयेत (ऑक्टोंबर १५, २००८ रोजी व्यवहार बंद झाल्यावर असलेल्या लिबॉर/स्वॅप रेट्स अधिक १०० बेसिस पॉईंटसच्या तुलनेने) |
| | | मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी असलेले लिबॉर/स्वॅप रेट्स हे, पुढील महिन्यापासून लागु होणऱ्या व्याज दरांसाठी मर्यादा-दर ठरविण्याचा आधार म्हणून समजले जातील. |
| | | व्याजदरांमधील वरील बदल हे सध्याच्या परिपक्वता कालानंतर नूतनीकरण केलेल्या प्रत्यावर्तनक्षम असलेल्या एनआरई ठेवींनाही लागु होतील. |
| | | २९.०४.२००३ पासून नवीन एनआरई ठेवींसाठी असलेला परिपक्वकाल हा सर्वसाधारणतः एक ते तीन वर्षाचा असेल. सध्याच्या परिपक्वता काळानंतर |

| | | |
|---|---|---|
| | | नूतनीकरण केलेल्या एनआरई ठेवींनाही हे लागु होईल. एखाद्या बॅंकेला तिच्या ॲसेट लायबिलिटी मॅनेजमेंटच्या दृष्टीकोनातून ३ वर्षांपेक्षा अधिक परिपक्वता काल असलेल्या ठेवी स्वीकारवयाच्या असल्यास, ती तसे करु शकते. मात्र तेव्हा, अशा दीर्घ मुदतीच्या ठेवींवरील व्याजदर ३ वर्षांच्या एनआरई ठेवींना लागु असलेल्या व्याजदरापेक्षा अधिक नसावा. |
| | | कार्यवाहीच्या सोयींसाठी, व्याजदर, सर्वात जवळच्या दोन दशांश स्थळांपर्यंत राउंड ऑफ केले जावेत. उदा. ३.६७६% चा चक्रवाढ व्याजदार हा ३.६८% होईल आणि ३.६४४% चे ३.६४% हीतील. |
| | | रॉयटर्स स्क्रीनच्या सर्व ग्राहक, फेडाईने दिलेले प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या कामाच्या दिवशी असलेले लिबॉर/स्वॅप रेट्स वेबपेजवरुन ॲक्सेस करु शकतात. पुढील महिन्यापासून लागू होणाऱ्या व्याजदारांसाठी हेच दर आधारभूत समजले जावेत. |